दुरितांचे तिमिर जावो!

शिक्षण प्रसारक मंडळ, अणदूर संचलित

# जवाहर कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,अणदूर

ता.तुळजापूर जि.उस्मानाबाद ४१३६०३

# राष्ट्रीय सेवा योजना

## सन २०१८–१९

150 YEARS OF CELEBRATING THE MAHATMA

# वार्षिक विशेष शिबीर अहवाल


**प्रा.सुर्यकांत आगलावे**

कार्यक्रमाधिकारी तथा

उस्मानाबाद जिल्हा समन्वयक रा.से.यो.

**प्रा.डॉ.गुंडू राठोड**

कार्यक्रमाधिकारी

**डॉ.उमाकांत चनशेट्टी**

प्राचार्य

जवाहर महाविद्यालय, अणदूर

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद

# जवाहर कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,अणदूर

ता.तुळजापूर जि.उस्मानाबाद ४१३६०३

## राष्ट्रीय सेवा योजना

## वार्षिक विशेष शिबीर सन २०१८—१९

# अहवाल

मागील वर्षाप्रमाणे याहीवर्षी विशेष शिबीरासाठी १०० विद्यार्थ्यांची मंजूरी विद्यापीठाकडून मिळाली होती.त्यानुसार दि.२४/१२/२०१८ ते ३०/१२/२०१८ दरम्यान मौजे खुदावाडी ता.तुळजापूर येथे ''जलसंवर्धन व जलव्यवस्थापनासाठी युवक'' या विषयावर वार्षिक शिबीर घेण्यात आले. एकूण सात दिवसाच्या निवासी शिबीरामध्ये खालील प्रमाणे कार्यक्रम घेण्यात आले.

**पहिला दिवस: सोमवार दि.२४/१२/२०१८**

शिबीराच्या पहिल्या दिवशी दु:१२वाजता सर्व विद्यार्थी व कार्यक्रमाधिकारी मौजे खुदावाडीसाठी निघाले.



दु:०१:०० वाजता शिबीरस्थळी पोहोचल्यावर खुदावाडीचे सरपंच श्री शरद नरवडे,उपसरपंच श्री पांडूरंग बोंगरगे,तंटामुक्ती अध्यक्ष श्री शिवाप्पा जवळगे,सोसायटीचे चेअरमन श्री तुकाराम बोंगरगे,पोलीसपाटील श्री. बसू सांगवे,श्री महादेव सालगे,श्री.राम जवळगे,प्रतिष्ठीत नागरीक डॉ. सिद्रामप्पा खजुरे व ग्रामस्थ यांच्या समवेत बैठक घेण्यात आली.त्यामध्ये एकूण सात दिवस होणा—या कार्यक्रमाची व श्रमदानातून करण्यात येणा—या कामाची चर्चा करण्यात आली बैठकीनंतर दु.०२:०० ते ०४:०० या वेळेत सर्व ग्रामस्थ व विद्यार्थी मिळून खुदावाडीच्या प्रवेश द्वारापासून शाळेपर्यंत स्वच्छता करण्यातआली.त्यानंतर काही विद्यार्थी स्टेज





व्यवस्थेसाठी, कांही विद्यार्थी स्वयंपाकाच्या व्यवस्थेसाठी,कांही विद्यार्थी कार्यक्रमाचे निमंत्रण देण्यासाठी खुदावाडी गावात फिरले. सायंकाळी ठिक ०६:३० वाजता शिबीराच्या उद्घाटनाचा कार्यक्रम सुरू झाला. कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून सोलापूर





## खुदावाडीत श्रमदान शिबिर; ग्रामस्वच्छता, वृक्षारोपणासह विद्यार्थी करणार प्रबोधन

प्रतिनिधी | अणदूर

येथील शिक्षण प्रसारक मंडळ संचालित जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने २४ ते ३० डिसेंबर दरम्यान खुदावाडीत (ता. तुळजापूर) वार्षिक विशेष श्रमदान शिबिर घेण्यात आले.

एनएसएस शिबिरात जलसंवर्धन व जल व्यवस्थापनासाठी 'युवक' हा विषय घेण्यात आला आहे. २४ रोजी खुदावाडी ग्रामस्थांसोबत बैठक घेऊन गाव स्वच्छतेला सुरुवात करून सायंकाळी सहा वाजता प्रमुख मान्यवरांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन झाले. विद्यार्थी गावात विविध उपक्रम राबवणार आहेत. या कालावधीमध्ये घेण्यात येत असलेल्या शिबिरामध्ये ग्राम स्वच्छता, वृक्षारोपण, सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन, राष्ट्रीय एकात्मता, पर्यावरण संवर्धन, अधश्रद्धा निर्मूलन, शेतकरी मेळावा, महिला मेळावा, बेटी बचाव- बेटी पढाव, जनजागरण रॅली, पशु चिकित्सा शिबिर, सर्वरोग निदान शिबिर आदी विविध विषयांवर कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. या शिबिराचे उद्घाटन सोलापूर जिल्हा सर्वोदय मंडळाचे अध्यक्ष प्राचार्य नरेश बदोरे यांच्या हस्ते झाले असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे अधिसभा सदस्य प्रा. डॉ. भगवानसिंह ढोबाळ हे होते. माजी आमदार व शिक्षण प्रसारक मंडळ अणदूरचे सचिव सि. ना. आलुरे गुरुजी, संस्थेचे अध्यक्ष भारत कस्तुरे, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य महादेवप्पा आलुरे, गो.का. बिच्चे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, सामाजिक कार्यकर्ते डॉ. सिद्रामप्पा खजुरे व खुदावाडीचे सरपंच शरद नरवडे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमाचे नियोजन व व्यवस्थापन एनएसएसचे जिल्हा समन्वयक प्रा. एस. डी. आगलावे व कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. जी. टी. राठोड करत आहेत.



## खुदावाडी येथे रासेयो शिबिराचे उद्घाटन

पुण्य नगरी । वृत्तसेवा

खुदावाडी: तुळजापूर तालुक्यातील खुदावाडी येथे जवाहर महाविद्यालय अणदुर व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना शिबिरास प्रारंभ झाला आहे. प्रारंभी माजी आ. सि. ना. आलुरे यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते जवाहर वार्तापत्राच्या विषेशांकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी सरपंच शरद नरवडे, उपसरपंच पांडुरंग बोंगरगे, सर्वोदय मंडळाचे अध्यक्ष प्रा. नरेश बदनोरे, जवाहर महाविद्यालयाचे प्राचार्य उमाकांत चनशेट्टी, मुख्याध्यापक संगमेश्वर जळकोटे, सेवानिवृत्त प्राचार्य अनिता मुदकन्ना, डॉ. सिद्रामप्पा खजुरे, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष शिवाप्पा जवळगे, तुकाराम बोंगरगे, रेवणसिध्द स्वामी, बसवेश्वर सांगवे, महादेव चिंचोले, विश्व बोंगरगे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

माजी आ.आलुरे यांची उपस्थिती





खाजगी वितरणाकरिता वार : शनिवार दिनांक : २६ जानेवारी २०१९

## खुदावाडी येथे "जवाहर" च्या राष्ट्रीय सेवा योजना शिबीर उद्घाटन समारंभ

अणदुर दि. २४ शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, जवाहर कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना (NSS) आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगबाद यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार दि. 24डिसेंबर ते 30 डिसेंबर या कालावधीमध्ये सन 2018-19 चे वार्षिक विशेष शिबीर खुदावाडी ता.तुळजापूर येथे घेण्यात येत असुन यासाठी "जलसंवर्धन व जलव्यवस्थापनासाठी युवक " हा विषय घेण्यात आला आहे. दि. 24 रोजी खुदावाडी ग्रामस्थांसोबत बैठक घेऊन गाव स्वच्छतेला सुरुवात करुन सायं. 6 वा. उद्घाटक सोलापूर जिल्हा सर्वोदय मंडळाचे अध्यक्ष तथा सेवा निवृत्त प्राचार्य नरेश बदनोरे आणि माजी आमदार , शिक्षण प्रसारक मंडळ अणदूर चे सचिव मा.श्री. सि.ना. आलुरे गुरुजी व व्यासपीठावरील सर्व मान्यवरांच्या हस्ते पुज्य साने गुरुजी व महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पुजन करुन उद्घाटन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी प्रास्ताविकामध्ये या राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत दि. 24 ते 30 डिसेंबर 2018 या कालावधीत घेण्यात येत असलेल्या शिबीरामध्ये ग्रामस्वच्छता, वृक्षारोपण, सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन, राष्ट्रीय एकात्मता, पर्यावरण संवर्धन, अंधश्रद्धा निमूर्लन, शेतकरी मेळावा, महिला मेळावा, बेटी बचाव-बेटी पढाव जनजागरण रॅली,पशु चिकीत्सा शिबीर, सर्वरोग निदान शिबीर अशा विषयावर कार्यक्रम घेण्यात येणार असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी माजी आमदार तथा शि.प्र.मं.मा.श्री.सि.ना.आलुरे गुरुजी हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे कोषाध्यक्ष श्री. गो.का. बिच्चे गुरुजी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी , सामाजिक कार्यकर्ते डॉ. सिद्रामप्पा खजुरे व खुदावाडी गावचे सरपंच शरद नरवडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी डॉ. सिद्रामप्पा खजुरे यांनी या शिबीरासाठी खुदावाडी हे गांव निवडल्याबाबत निर्णयाचे स्वागत केले. यावेळी जवाहर महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक वृंद ,शिक्षकेत्तर कर्मचारी, खुदावाडी गावातील विविध समित्याचे पदाधिकारी, संत विनोबा भावे विद्यालयाचे मुख्याध्यापक रामचंद्र साखरे , मुख्याध्यापक संगमेश्वर जळकोटे यांच्या सोबत खुदावाडी येथील ज्येष्ठ नागरिक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. एम.बी. बिराजदार यांनी केले.तर आभार प्रा. एस.डी. आगलावे यांनी मानले. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी एन.एस.एसचे जिल्हासमन्वयक प्रा. एस.डी. आगलावे, कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. राठोड जी.टी. प्रा.कंदले प्रसन्न , प्रा. बाराते यांनी प्रयत्न केले.

जिल्हा सर्योदय मंडळाचे अध्यक्ष प्राचार्य नरेश बदनोरे हे तर अध्यक्ष म्हणून शिक्षण प्रसारक मंडळ अणदूरचे सचिव मा.श्री सि.ना.आलूरे गुरूजी हे होते.प्रमुख उपस्थिती मध्ये संस्थेचे कोषाध्यक्ष श्री.गो. का.बिच्चे,जवाहर विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री संगमेश्वर जळकोटे,सरपंच,श्री.शरद नरवडे,उपसरपंच श्री पांडूरंग बोंगरगे,मा.डॉ.सिद्रामप्पा खजुरे,श्री तुकाराम बोंगरगे,श्री शिवाप्पा जवळगे, श्री दिगंबर कबाडे श्री सचिन नरवडे,श्री रेवणसिध्द स्वामी, श्री. गंगाधर चिचोले, प्राचार्य डॉ.उमाकांत चनशेट्टी,प्राध्यापाक व खुदावाडीचे ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते. प्राचार्य नरेश बदनोरे सरांनी विद्यार्थ्यांना व ग्रामस्थांना नितीमूल्याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. प्रास्तावीक प्राचार्य डॉ.उमाकांत चनशेट्टी यांनी केले. डॉ.सिद्रामप्पा खजुरे व श्री

सि.ना.आलूरे गुरूजी यांनीही मार्गदर्शन केले. सूत्रसंचलन प्रा.डॉ.मल्लीनाथ बिराजदार यांनी तर आभार जिल्हा समन्वयक प्रा.सुर्यकांत आगलावे यांनी मानले.

## जवाहर महाविद्यालयाचे खुदावाडीत राष्ट्रीय सेवा योजना शिबिरास प्रारंभ

प्रतिनिधी | नळदुर्ग

तुळजापूर तालुक्यातील खुदावाडी येथे जवाहर महाविद्यालय (अणदूर ) व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने सेवा योजना शिबिरास प्रारंभ करण्यात आले. तसेच उपस्थित मान्यवरांच्या हस्ते 'जवाहर' वार्तापत्राच्या विशेष अंकाचे प्रकाशनही करण्यात आले.

खुडावाडी येथे चालणाऱ्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिर सुरू झाले असून ते ३० डिसेंबर या कालावधीत जलसंवर्धन, जल व्यवस्थापन, स्वच्छता मोहीम, शेतकरी मेळावा, महिला मेळावासह विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहेत. या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी माजी आमदार सि. ना. आलुरे गुरुजी यांचा हस्ते दीप प्रज्वल करून करण्यात आले. याप्रसंगी सोलापूर सर्वोदय मंडळाचे अध्यक्ष प्रा. नरेश बदनोरे, जवाहर महाविद्यालयाचे प्राचार्य उमाकांत चनशेट्टी, मुख्याध्यापक संगमेश्वर जळकोटे, माजी प्राचार्य डॉ. अनिता मुदकन्ना, सामाजिक कार्यकर्ते डॉ. सिद्रामप्पा खजुरे, सरपंच शरद नरवडे, उपसरपंच पांडुरंग बोंगरगे, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष शिवाप्पा जवळगे, सोसायटीचे चेअरमन तुकाराम बोंगरगे, माजी सरपंच रेवणसिध्द स्वामी, पोलिस पाटील बसवेश्वर सांगवे, महादेव चिंचोले, विश्व बोंगरगे आदीसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते. जलसंवर्धन, जल व्यवस्थापन, स्वच्छता मोहीम, शेतकरी मेळावा, महिला मेळावासह विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाणार आहेत.

## 'जवाहर' च्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराला प्रारंभ



लोकमत न्यूज नेटवर्क

अणदूर : येथील जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने २४ ते ३० डिसेंबर या कालावधीमध्ये विशेष शिबीर खुदावाडी येथे घेण्यात येत आहे. यांअंतर्गत मंगळवारी ग्रामस्थांसोबत बैठक घेऊन गाव स्वच्छतेला सुरुवात करण्यात आली.

शिबिराचे उद्घाटन सोलापूर जिल्हा सर्वोदय मंडळाचे अध्यक्ष नरेश बदनोरे आणि माजी आमदार सि. ना.आलुरे गुरुजी यांच्या हस्ते झाले. संस्थेचे कोषाध्यक्ष गो.का.बिच्चे गुरुजी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.उमाकांत चनशेट्टी, सामाजिक कार्यकर्ते डॉ.सिद्रामप्पा खजुरे व खुदावाडीचे सरपंच शरद नरवडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी प्रास्ताविकामध्ये शिबिरातील उपक्रमांची माहिती दिली. सूत्रसंचालन प्रा. डॉ. एम. बी. बिराजदार यांनी केले तर आभार प्रा. एस. डी. आगलावे यांनी मानले. शिबिरासाठी रासेयोचे जिल्हा समन्वयक प्रा. एस. डी. आगलावे व कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. राठोड जी. टी. यांनी पुढाकार घेतला आहे.

## खुदावाडी येथे आजपासून जवाहर महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना शिबीर

अणदूर.दि.२३ (प्रतिनिधी): येथील शिक्षण प्रसारक मंडळ संचलित जवाहर कला , विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना (एन. एस.एस.) आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने आज सोमवार दि.२४ डिसेंम्बर ते ३० डिसेंम्बर या कालावधीत सन २०१८-१९ चे वार्षिक विशेष शिबीर खुदावाडी ता.तुळजापूर येथे घेण्यात येत आहे. * जलसंवर्धन व जल व्यवस्थापनासाठी म युवक म हा विषय घेण्यात आला आहे. दि.२४ रोजी खुदावाडी ग्रामस्थासोबत बैठक घेऊन गाव स्वच्छतेला सुरुवात करून सायंकाळी ६ वाजता प्रमुख मान्यवरांच्या हस्ते या शिबिराचे उदघाटन होणार आहे. या कालावधीमध्ये घेण्यात येत असलेल्या शिबिरामध्ये ग्राम स्वच्छता, वृक्षारोपण, सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन, राष्ट्रीय एकात्मता, पर्यावरण संवर्धन, अधश्रद्धा निर्मूलन, शेतकरी मेळावा, महिला मेळावा,बेटी बचाव- बेटी पढाव जनजागरण रॅली,पशु चिकित्सा शिबीर, सर्वरोग निदान शिबीर आदी विविध विषयांवर कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. या शिबिराचे उदघाटन सोलापूर जिल्हा सर्वोदय मंडळाचे अध्यक्ष प्राचार्य नरेश बदोरे यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे अधिसभा सदस्य प्रा.डॉ.भगवानसिंह ढोबाळ हे राहणार आहेत.तर माजी आमदार व शिक्षण प्रसारक मंडळ अणदूर चे सचिव श्री.सि. ना.आलुरे गुरुजी, संस्थेचे अध्यक्ष भारत कस्तुरे, जि.प.माजी सदस्य महादेवप्पा आलुरे, गो.का. बिच्चे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.उमाकांत चनशेट्टी,सामाजिक कार्यकर्ते डॉ.सिद्रामप्पा खजुरे व खुदावाडीचे सरपंच शरद नरवडे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे तर साधनव्यक्ती म्हणून दैनिक वर्तमानपत्राचे ज्येष्ठ पत्रकार बंधुही या शिबिरामध्ये सहभागी होत आहेत.

या कार्यक्रमाचे नियोजन व व्यवस्थापन एन.एस.एस.चे जिल्हा समन्वयक प्रा.एस.डी. आगलावे व कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.जी.टी. राठोड करीत आहेत.

दुसरा दिवस: मंगळवार दि.२५/१२/२०१८ रोजी शिबीराच्या दुस—या दिवशी सकाळी पहाटे उठून विद्यार्थ्यांनी प्राणायाम व योगासने केली. प्रा.डॉ. बिराजदार व प्रा.आगलावे यांनी विद्यार्थ्यांना योगासनाचे धडे दिले.सकाळी ०९:००वाजता नाष्टा आटोपून विद्यार्थी श्रमदानासाठी तयार झाले.दुपारी १:०० वाजेपर्यत विद्यार्थ्यांनी गावक—यासोबत गाव स्वच्छ केले. श्रमदानामध्ये गावक—यांचा सहभाग विशेष होता. दुपारच्या जेवणानंतर ठिक ०३:०० वाजता जवाहरलाल नेहरू नंतरची भारतीय





राजकरणातील दुसरी पिढी या विषयवार सोलापूरचे जेष्ठ पत्रकार श्री अरविंद जोशी यांचे मार्गदर्शन झाले. मार्गदर्शनाला गावातील काही तरूण उपस्थित होते. पाहुण्यांनी मार्गदर्शनामध्ये यशवंतराव चव्हाण यांच्या कार्याबद्ल सविस्तर माहिति सांगीतली. पाहुण्यांचा परिचय कु.जयश्री शिंदे,सुत्रसंचलन संतोष चव्हाण तर आभार कु.सुषमा नवगिरे यांनी मानले सायं ६ वाजता प्रबोधनात्मक कार्यक्रमामध्ये सामाजिक परिवर्तन संस्था, नळदुर्ग चे सचिव श्री मारूती बनसोडे यांनी ''पाणी फांउडेशन आणि ग्रामस्थाची भूमिका या विषयावर सविस्तर असे मार्गदर्शन केले.



कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री शेकाप्पा सालगे ग्रामपंचायत सदस्य खुदावाडी हे होते. प्रमुख उपस्थितीमध्ये उपसरपंच श्री पांडूरंग बोगरगें, श्री तुकाराम बोंगरगे व ग्रामस्थ उपस्थिती होते आभार प्रा.सुर्यकांत आगलावे यांनी मानले.

**तिसरा दिवस: बुधवार दि.२६/१२/२०१८**

शिबीराच्या तिस—या दिवशी सकाळी लवकर उठून योग शिक्षक श्री लक्ष्मण नरे यांनी विद्यार्थ्याचे प्राणायाम व योगासने घेतली. नाष्टयानंतर सकाळी



९:००ते दुपारी १:०० पर्यत खुदावाडी येथील लहूजी चौक,सुतार गल्ली,हरिजन वस्ती येथील सार्वजनिक स्वच्छता केली.

दुपारच्या जेवणानंतर दु.३ ते ५या वेळेमध्ये सोलापूर विद्यापीठातील संशोधक विद्यार्थ्यीनी कु.मंजुषा कदम व कु.सुप्रिया पाटील यांनी खुदावाडी येथील ९वी व १०वी चे विद्यार्थी, शिबीरार्थी यांना ''सायबर सेक्युरिटी अवेअरनेस'' या विषयावर एल.सी.डी. प्रोजेक्टरच्या सहाय्याने सविस्तर मार्गदर्शन केले.







सायबर गुन्हे कसे होतात त्याचे परिणाम काय होतात व ते होवू नयेत म्हणुन घ्यावयाची काळजी या बाबी सविस्तर पणे सर्वांना समजावून दिल्या.



कार्यक्रमाच्या अध्यक्ष म्हणून प्रा.सुरेखा भारती या होत्या.पाहुण्याचा परिचय सुरवसे सोपान,सुत्रसंचलन कु.मुळे तर आभार कु.दिपाली बनसोडे हिने मानले. सायकाळी ६ वाजता जलसंवर्धन व जल व्यवस्थापन या विषयावर बोलणारे डॉ.रविंद्र उप्पीन हे न आल्यामुळे महाराष्ट्र सरकारने बनवलेल्या डाक्युमेंट्री फिल्मच्या सिडी प्रोजेक्टरवर दाखवण्यात आल्या. त्यामध्ये आरोग्य लक्ष्मी,स्वच्छता दूत,शापीत जलबिंदू, सोन पावल व अक्षयप्रकाश योजना इत्यादी सिडी दाखवण्यात आल्या हा कार्यक्रम चौकामध्ये हनुमान मंदिरासमोर घेतल्यामुळे गावातील ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.

## चौथा दिवस: गुरूवार दि.२७/१२/२०१८

शिबीराच्या चौथ्या दिवशी सकाळी लवकर उठून विद्यार्थ्यांनी प्राणायाम व योगासने केली. नाष्टयानंतर सकाळी ८ ते १० या वेळेत प्राथमिक शाळेचा परिसर व चौकातील साफसफाई केली. नंतर सकाळी १० ते ५ या वेळेत तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय,तुळजापूर येथे डिस्ट्रीक्ट इंटरशिप प्रोग्रामच्या प्रशिक्षणासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सांगण्यावरून ३८ विद्यार्थी सहभागी होण्यासाठी गेले. सायं ६ वाजता शेतकरी मेळावा घेण्यात आला.मेळाव्यासाठी ‘कृषिविषयक योजना’ या विषयावर बोलण्यासाठी उस्मानाबादचे कृषिअधिक्षक श्री उमेश घाटगे



तर ‘‘कृषिपुरक उदयोग’’ या विषयावर बोलण्यासाठी वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख कृषीविज्ञान केंद्र,सोलापूरचे डॉ. लालासाहेब तांबडे हे उपस्थित होते.



दोघांनी खूदावाडी येथील शेतक—यांना व विद्यार्थ्यांना सविस्तर असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून खुदावाडीचे सदन शेतकरी श्री.भालचंद्र कबाडे हे होते. या वेळी डॉ. सिद्रमाप्पा खजुरे यांनीही शेतक—यांना व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व आभार मानले या

कार्यक्रमासाठी गावातील प्रतिष्ठीत नागरीक, खुदावाडीच्या कृशिसहाय्यक सौ.जोगदंड ताई व शेतकरी मोठयासंख्येने उपस्थित होते.

**पाचवा दिवस: शुक्रवार दि.२८/१२/२०१८**

शिबीराच्या पाचव्या दिवशी सकाळी लवकर उठून विद्यार्थ्यांनी प्राणायाम व योगासने केली. नाष्टयानंतर सकाळी ९ ते दुपारी १ या वेळेत श्रमदानात



विद्यार्थ्यांनी डॉ.खजुरे यांच्या शेताकडील कोल्हापूर टाईप बंधा—याची साठवण क्षमता खोलीकरण व रूदीकरण करून वाढवली.




त्याचा फायदा शेजारच्या शेतीसाठी पाऊस पडल्यानंतर होईल. दुपारच्या जेवणानंतर ३ वाजता गावातून 'बेटी बचाव बेटी पढाव' जनजागरण रॅली काढण्यात आली.

रॅली गावात फिरत असताना विद्यार्थ्यांनी मुलींचे महत्व वाढवणा—या घोषणा दिल्या व रॅली नंतर होणा—या महिला मेळाव्याला उपस्थित राहण्याचे निमंत्रण गावातील महिलांना दिले.




रॅली नंतर साय.५ वा मंगल कार्यालयात महिला मेळावा घेण्यात आला. महिला मेळाव्यासाठी सोलापूरच्या उदयोग वर्धीनीच्या संचालिका सौ. सुलोचना भाकरे यांनी महिलांचे गृहउदयोगातून सबलीकरण या विषयावर मार्गदर्शन केले.






कार्यक्रमाच्या अध्यक्ष सौ.अलकाताई सालगे हया

होत्या. प्रमुख उपस्थिती मध्ये प्रा.गडसिंग मॅडम प्रा. भारती मॅडम, सौ.संगीता कापसे,सौ.जनाबाई खजुरे,सौ सुशिल खंदारे, व इतर महिला उपस्थित होत्या.



पाहुण्यांचा परिचय प्रा.डॉ.बिराजदार एम.बी.यांनी केला सुत्रसंचलन कु.इसाके सरोजा तर आभार कु. नवगिरे सुषमा हिने मानले.

## सहावा दिवस: शनिवार दि.२९/१२/२०१८

शिबीराच्या सहाव्यादिवशी सकाळी लवकर उठून विद्यार्थ्यांनी प्राणायाम व योगासने केली. अल्पोपहारानंतर सकाळी ९ ते दुपारी १ वाजता या वेळेत श्रमदान करताना विद्यार्थ्यांनी खुदावाडीचा मेन रोड, ग्रंथालय, मारूती मंदिर समोरील स्वच्छता केली.



काही विद्यार्थ्यांनी याच वेळेत झालेल्या पशुचिकित्सा शिबीरामध्ये सहभाग घेतला अणदूरचे पशुधन



विकास अधिकारी डॉ.कोळेकर ए.ई.व त्यांचे सहकारी यांनी पशुचिकित्सा शिबीरामध्ये एकूण ३५ जनावरांना लसीकरण करून त्यांच्या विविध तपासण्या केल्या व औषधे दिली



दुपारच्या जेवणानंतर विद्यार्थी व कार्यक्रमाधिकारी



यांनी गटचर्चा केली. संस्थेचे सचिव मा.श्री.सि.ना. आलूरे गुरूजी यांची भावजय श्रीमती सुधाबाई बसवणाप्पा आलूरे यांचे दु:खद निधन झाल्यामुळे रात्री होणारा विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम रद्द करण्यात आला.

## सातवा दिवस: रविवार दि.३०/१२/२०१८

शिबीराच्या सातव्या दिवशी विद्यार्थ्यांनी सकाळी उठून प्राणायाम व योगासने केली अल्पोपहारानंतर सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत यशोधरा सुपर स्पेशालीटी हॉस्पीटल,सोलापूर व राष्ट्रीय सेवा योजना जवाहर महाविद्यालय, अणदूर यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत सर्वरोग निदान शिबीर घेण्यात आले.



यशोधरा हॉस्पीटलचे ५ तज्ञ डॉक्टर सोबत इतर २० जण मोफत आरोग्य तपासणी साठी आले होते.







विविध आजारावर एकुण १२७ रूग्णांची तपासणी केली व औषधे देण्यात आली. आरोग्य शिबिरादरम्यान विद्यार्थ्यांनी रूग्णाची सेवा केली व



दि. २६ जानेवारी २०१९ | २

"जवाहरच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबीराचा"
मोफत आरोग्य तपासणी शिबीराने सांगता

अणदुर दि. येथील जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय - राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यामाने तसेच यशोधरा सुपर स्पेशालिस्ट, सोलापूर यांच्या सहयोगाने खुदावाडी येथे मोफत आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. यासाठी शिबीरासाठी यशोधरा-हॉस्पिटल येथील हृदयरोग तज्ञ डॉ. मुक्तेश्वर शेटे, किडणीविकार तज्ञ डॉ. संदीप लांडगे , पोट व हाडाचे तज्ञ शरण पाटील, स्त्रीरोग तज्ञ डॉ. वैष्णवी शिरसीकर तसेच जनसंपर्क अधिकारी दत्ता होसमणी व धनंजय मुळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या शिबीरामध्ये मुत्राशय व किडणीचे आजार, मणक्याचे व हाडाचे आजार, हृदय विकार, तसेच रक्तदाब, मधुमेय , इसीजी तपासणी तज्ञ डॉक्टरांकडुन मोफत करण्यात आली. या शिबीराचा दीडशेहुन अधिक गरजु रुग्णांनी लाभ घेतला . या आरोग्य तपासणी शिबीराचे व

दिनांक 24 ते 30 डिसेंबर या कालावधीमध्ये राबविले गेलेल्या विविध उपक्रमाचे आयोजन केल्याबाबत खुदावाडी ग्रामस्थांनी शिक्षण प्रसारक मंडळ अणदूर चे कौतुक केले.

शेवटी जवाहर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी या शिबीरासाठी खुदावाडी गावातील प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य केलेल्या कार्यकर्त्यांचे व ग्रामस्थांचे आभार मानले.

या शिबीराच्या उद्घाटन कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. डॉ. एम.बी. बिराजदार , प्रास्ताविक रा.से.यो.चे जिल्हासमन्वयक प्रा. डॉ. आगलावे यांनी तर आभार कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. राठोड

यशस्वीरित्या संपन्न करण्यासाठी प्रा.डॉ. एस.एस. बाड, प्रा.प्रसन्न कंदले, प्रा. एस. राजमाने, प्रा. म्हमाणे, प्रा. बाराते यांच्या सह शिबीरातील प्रशिक्षणार्थी व ग्रामस्थांनी परिश्रम घेतले तर इतर सर्व उपक्रमामध्ये महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर

सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या. दुपारच्या जेवणानंतर ४ वाजता शिबीराचा समारोपाचा कार्यक्रम घेण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.उमाकांत चनशेट्टी हे होते.प्रमुख पाहुणे म्हणून खुदावाडीचे



सरपंच श्री.शरद नरवडे हे होते. प्रास्ताविक व

आहवाल वाचन जिल्हा समन्वयक प्रा.सुर्यकांत



आगलावे यांनी केले.काही विद्यार्थ्यांनी शिबीराचा अनुभव सांगीतला.



सरपंच श्री.नरवडे यांनी शिबीराबद्दल व सामाजिक कार्याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षिय समारोपामध्ये प्राचार्य डॉ.चनशेट्टी यांनी समाजसेवेचे महत्व सांगून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सुत्रसंचलन प्रा.डॉ.मल्लीनाथ बिराजदार यांनी तर आभार कार्यक्रमाधिकारी डॉ.राठोड जी.टी.यांनी मानले वंदेमातरम् नंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

# राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचा समारोप

लोकमत न्यूज नेटवर्क

अणदूर : येथील जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या वतीने खुदावाडी येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजना शिबीराच्या समारोप जवाहर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.

यावेळी सरपंच शरद नरवडे, उपसरपंच पांडुरंग बोंगरगे, शेकाप्पा सालगे, तंटामुक्तीचे अध्यक्ष शिवाप्पा जवळगे, महादेव चिंचोले, पोलीस पाटील बसवेश्वर सांगवे, मुख्याध्यापक चंद्रकांत साखरे, आयुब टिनवाले यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. एम. बी. बिराजदार तर आभार दिपाली बनसोडे यांनी मानले. कार्यक्रमासाठी प्रा. जी. टी. राठोड, प्रा. बी. टी. बाराते यांच्यासह विद्यार्थी, ग्रामस्थांनी पुढाकार घेतला.

सकाळ

# जवाहर महाविद्यालयाच्या रासेयो शिबिराचा समारोप

**अणदूर, ता. १ (बातमीदार) :** जवाहर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचा समारोप रविवारी (ता. ३०) झाला. अखेरच्या दिवशी मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले.

राष्ट्रीय सेवा योजना व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने ता. २४ ते ३० डिसेंबर या कालावधीत खुदावाडी (ता. तुळजापूर) येथे शिबिर घेण्यात आले. यात ग्रामस्वच्छता, जलसंवर्धन, वृक्षारोपण, सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन, राष्ट्रीय एकात्मता, पर्यावरण संवर्धन, अंधश्रद्धा निर्मूलन, शेतकरी, महिला मेळावा, बेटी पढाओ, बेटी बचाओ, जनजागरण, पशुचिकित्सा आदी विषयांवर परिसंवाद आयोजन करण्यात आले होते. डॉक्टरांकडून मोफत करण्यात आली. या शिबिराचा दीडशेहून अधिक गरजू रुग्णांनी लाभ घेतला. प्रा. डॉ. एम. बी. बिराजदार यांनी सूत्रसंचालन केले. प्रास्तविक प्रा. डॉ. एस. डी. आगलावे यांनी केले. तर प्रा. डॉ. जी. टी. राठोड यांनी आभार मानले. प्रा. डॉ. एस. एस. बाड, प्रा. प्रसन्न कंदले, प्रा. एस. राजमाने, प्रा. म्हमाणे, प्रा. बाराते यांच्यासह शिबिरातील प्रशिक्षणार्थी व ग्रामस्थांनी पुढाकार घेतला.



शिबीर यशस्वी होण्यासाठी प्रा.सुर्यकांत आगलावे, प्रा.डॉ.राठोड जी.टी, प्रा.बाराते बी.टी., प्रा.डॉ.बिराजदार एम.बी., खुदावाडीचे सरपंच श्री. शरद नरवडे, डॉ.सिद्रामप्पा खजुरे,श्री.शिवप्पा जवळगे, श्री.तुकाराम बोंगरगे, श्री.राम जवळगे, श्री अमित आलूरे यांनी परिश्रम घेतले शिबीरामध्ये एकूण ५१ विद्यार्थी, ४९ विद्यार्थ्यीनी, तीन प्राध्यापक व एक शिपाई यांनी सहभाग घेतला.